# महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण

**Maharashtra Housing & Area Development Authority**

**जनसंपर्क विभाग**

कक्ष क्र. १९/२०, तळ मजला, गृहनिर्माण भवन, कला नगर, वांद्रे पूर्व, मुंबई - ४०००५१.
दू. क्र. :- ०२२ ६६४०५०७७, ६६४०५०६६ ई मेल - cpromhada@gmail.com


==========================================================================

जा.क्र.जसंवि/प्रसिद्धी पत्रक/३५४१ दि. २६/११/२०२१

प्रसिद्धी पत्रक

## मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाचे सभापती श्री. विनोद घोसाळकर यांनी मौलाना शौकत अली रोडवरील धोकादायक उपकरप्राप्त इमारतीची केली पाहणी

मुंबई, दि. २६ नोव्हेंबर, २०२१ - मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाचे सभापती श्री. विनोद घोसाळकर यांनी आज मौलाना शौकत अली रोडवरील इमारत क्रमांक १६०,१६८ या धोकादायक उपकरप्राप्त इमारतीची पाहणी केली.

यावेळी 'म्हाडा'चे उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. अनिल डिग्गीकर, मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाचे मुख्य अधिकारी श्री. अरुण डोंगरे, कार्यकारी अभियंता श्री. सी. जे. राव आदी उपस्थित होते.

सदर इमारत तळ अधिक ४ मजल्यांची असून या इमारतीत ३२ निवासी भाडेकरू/ रहिवासी वास्तव्यास असून ९ अनिवासी गाळे आहेत.

या पाहणी दौऱ्यात श्री. विनोद घोसाळकर यांनी इमारतीतील भाडेकरू /रहिवासी, मूळ जागा मालक यांना प्रत्यक्ष भेटून सदर इमारतीच्या तळ व पहिल्या मजल्यावरील कॉलम व बीम धोकादायक स्थितीत असून इमारतीची संरचनात्मक दुरुस्ती तात्काळ होणे गरजेचे असल्याचे सांगितले. इमारतीच्या संरचनात्मक दुरुस्तीसाठी मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाला येणाऱ्या खर्चा व्यतिरिक्त सुमारे ७० लाख रुपये अतिरिक्त खर्च येणार आहे. सदर अतिरिक्त खर्च मालक व भाडेकरू/रहिवासी यांनी करणे गरजेचे असल्याचे श्री. घोसाळकर यांनी सांगितले. इमारतीच्या संरचनात्मक दुरुस्तीसाठी आवश्यक सदर अतिरिक्त खर्च देण्यास मूळ जागा मालक, भाडेकरू/ रहिवासी जोपर्यंत तयार होत नाही तोपर्यंत इमारतीच्या दुरुस्तीचे काम रखडणार असल्याचे श्री. घोसाळकर यांनी सांगितले. इमारतीच्या दुरुस्तीसाठी सदर अतिरिक्त खर्चाबाबत मूळ जागा मालक व भाडेकरू /रहिवासी यांनी तात्काळ निर्णय घेण्याचे आवाहन श्री. घोसाळकर यांनी केले. धोकादायक स्थितीतील या इमारतीत कुठलीही जीवित व वित्त हानी होऊ नये, याकरिता सदर इमारतीची दुरुस्ती होणे अत्यंत गरजेचे असल्याचे श्री. घोसाळकर यांनी यावेळी सांगितले.

इमारतीच्या दुरुस्ती संदर्भात अधिक चर्चा करण्यासाठी म्हाडाच्या वांद्रे पूर्व येथील श्री. घोसाळकर यांच्या दालनात बुधवार, दि. ०१ डिसेंबर २०२१ रोजी इमारतीचे मूळ जागा मालक, भाडेकरू /रहिवासी यांची बैठक बोलावली असल्याचे श्री. घोसाळकर यांनी सांगितले.

(सही /-)
जनसंपर्क अधिकारी/म्हाडा






TALHA BHAI
9619933448

----*****----